**<u>प्रेसनोट दि.१४/०६/२०१९</u>**

## <u>वानवडी पोलीस स्टेशन पुणे</u>
## मिसिंग मुलीचा घेतला तात्काळ शोध.

वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३२०/२०१९ भादवी कलम ३६३ मधील फिर्यादी नामे मेहरजहॉ जावेद शेख रा. अभ्योदय सोसायटी, वानवडी, पुणे. यांनी त्यांची अल्पवयीन मुलगी हिस कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेलेबाबत संशय व्यक्त केल्याने सदरबाबत वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे तपासाबाबत पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांचे पाठपुराव्याने व मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक अ.ई.शेटे, यांनी पो.शि. लाहिगुडे यांचे मदतीने पिडीत मुलीचे मोबाईलचे सी.डी.आर. चे ॲनालीसीस करून माहिती काढली असता सदर मुलीचे लोकेशन साखरखेडा ता. सिंदखेडा जि. बुलढाणा येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने पो.हवा. ठाकरे, पो.शि. सोनवणे व महिला पोलीस शिपाई पुनम खामकर यांनी दि.१४/०६/२०१९ रोजी सदर ठिकाणी जाऊन दाखल गुन्ह्यातील पिडीत मुलगी व आरोपी नामे सोहेल खान हे मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि शेटे यांनी नमुद कर्मचारी यांचेसह कुशलतेने व तत्परतेने तपास करून पिडीत मुलीचा व आरोपीचा तपास करून ताब्यात घेतले आहे.

(क्रांतीकुमार पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वानवडी पोलीस स्टेशन पुणे